ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधान:” इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २२ पुणें, बुधवार तारीख ११ जानेवारी, १९५६ अंक १

## विविध माहिती

**कापड-कामगारांबाबत चौकशी**—राजस्थान राज्यांतील कापड-गिरण्यांत काम करणाऱ्या कामगारांचें वेतन व इतर परिस्थिति ह्यांची चौकशी करण्यासाठी राज्य सरकारनें एक कमिटी नेमली आहे. कमिटीवर गिरणीमालकांचे दोन व कामगारांचे दोन प्रतिनिधी असतील. त्याशिवाय अध्यक्ष असेलच. कमिटीनें आपला अहवाल व शिफारसी दोन महिन्यांत सादर करावयाच्या आहेत.

**रशियन भाषेंतील ‘अमेरिका’**—रशियामध्यें विक्रीसाठी ‘अमेरिका’ ह्या मासिकाच्या प्रकाशनास युनायटेड स्टेट्सचें सरकार पुन: प्रारंभ करणार आहे. हें मासिक रशियन भाषेंत छापलें जाईल. युद्धकाळांत तें सुरू करण्यांत आलें व १९५२ मध्यें बंद केलें गेलें. मासिकाचें संपादन व मुद्रण अमेरिकेंत होईल व मॉस्कोला तें विमानानें पाठविलें जाईल. मासिकाला रशियन सेन्सॉरची कात्री लावली जाणार नाहीं; सांस्कृतिक बिगर-राजकीय विषयच फक्त त्यांत घेतले जातील.

**मोटारगाड्यांची किंमत उतरली पाहिजे**—भारतांत नव्या मोटारगाड्यांची मागणी पूर्वीप्रमाणें वाढत चाललेली नाहीं. वाढीची वार्षिक गति १९४३ ते १९४८ ह्या मुदतींत ८·८% होती, ती १९४९ ते १९५४ ह्या मुदतींत ३·७% वर आली. भारतांतील मोटारगाड्यांच्या किंमती उतरविल्या, तरच मागणी वाढेल. ह्या दृष्टीनें सरकारनें प्रयत्न करावेत, अशी सूचना वेस्टर्न इंडिया ऑटोमोबाइल असोसिएशननें केली आहे.

**शिक्षकांची बिनव्याजी कर्जाची मागणी**—भोपाळमधील शिक्षकांच्या संघाची वार्षिक बैठक झाली. बैठकींत शिक्षकांसाठी आरोग्यदायक घरांची मागणी करण्यांत आली. त्याचप्रमाणें शिक्षकांचा सुरवातीचा किमान पगार वाढविण्यांत यावा आणि त्यांची आर्थिक परिस्थिति सुधारण्यासाठी राज्य-सरकारनें बिनव्याजी कर्जे पुरविण्याची व्यवस्था करावी, असा ठरावहि मंजूर करण्यांत आला. शिक्षकांच्या मागण्या राज्य-सरकारकडे सादर करण्यासाठी एक कमिटी नेमण्यांत आली.

**उसाच्या लागवडीची योजना**—दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या मुदतींत मद्रास सरकारनें उसाच्या लागवडीची वाढ करण्याची योजना आखली आहे. ह्या योजनेसाठी २१ लाख रुपये खर्च करण्यांत यावयाचे आहेत. उसाच्या लागवडीचें क्षेत्र ५०,००० एकरांनीं वाढविण्याचा आणि साखरेचें उत्पादन ९०,००० टनांनीं वाढविण्याचा सरकारचा विचार आहे. त्याशिवाय, उसासंबंधीं संशोधन करणारीं दोन केंद्रेंहि स्थापन करण्यांत येतील.

**कापड कामगारांना बोनस**—अहमदाबाद शहरांत कापडाच्या ६६ गिरण्या आहेत. त्यांपैकीं ५३ गिरण्यांनीं आतांपर्यंत आपल्या कामगारांना १९५४ सालचा बोनस देण्याचें मान्य केलें आहे. कापड कामगारांची एकूण संख्या सुमारें १,२८,००० आहे. त्यांपैकीं १,००,००० कामगारांना बोनसचा फायदा मिळाला आहे. गिरणीमालक संघ व कामगार संघ ह्यांच्यांत ठरलेल्या कराराप्रमाणें बोनस देण्यांत येत आहे.

**युद्धांतील नुकसान-भरपाई**—दुसऱ्या महायुद्धांत जपानच्या सैन्यानें ब्रह्मदेश व्यापला होता. त्यावेळीं ब्रह्मदेशाची जी आर्थिक नुकसानी झाली, तिची अंशत: भरपाई करण्यासाठी जपान ब्रह्मदेशांत एक मोठें जलविद्युत केंद्र बांधणार आहे. १९५४ मध्यें जपान व ब्रह्मदेश ह्यांच्यांत करार करण्यांत येऊन जपाननें २५ कोटी डॉलर्स नुकसानभरपाई दाखल देण्याचें कबूल केलें आहे.

**राजमहेंद्री येथें टेलिफोन एक्सचेंज**—राजमहेंद्री येथें नवा टेलिफोन एक्सचेंज उघडण्यांत आला आहे. पहिल्या व्यवस्थेंत ३०० टेलिफोनची सोय होती. नव्या व्यवस्थेंत ४०० टेलिफोन्सची सोय असून ती ६०० पर्यंत वाढवितां येण्यासारखी तरतूद करण्यांत आली आहे.

**मध्यवर्ती नांगर संघटना** – मध्यवर्ती सरकारच्या यंत्रचलित नांगर संघटनेनें आतांपर्यंत मध्यभारतामधील १० लाख एकर जमिनींतील तण खणून काढून ती लागवडीस योग्य केली आहे. त्याशिवाय उत्तर प्रदेशांतील ४१,००० एकर जंगलमय जमीन व भोपाळ राज्यांतील ४८,००० एकर जंगल जमीनहि संघटनेनें लागवडीस योग्य अशी केली आहे.

**अंबर चरखा वापरण्याचें शिक्षण**—भोपाळ सरकारनें अंबर चरखा चालविण्याचें व त्याचे सुटे भाग तयार करण्याचें शिक्षण देण्याची एक योजना आखली असून ती पुढील महिन्यापासून अंमलांत आणण्यांत येईल. पहिल्या तुकडींत ६० जणांना ह्या संबंधीचें शिक्षण देण्यांत येणार आहे. शिक्षण चालू असतां विद्यार्थ्यांना दरमहा ३० रुपये देण्यांत येतील.

**शेतीच्या अवजारांची देणगी**—सरकारच्या मालकीचें एक मोठें शेत स्थापन करण्यासाठी रशिआनें भारताला बरींच शेतीचीं अवजारें देणगी म्हणून देऊं केलीं आहेत. ह्या अवजारांत ७२ यंत्रचलित नांगर, ६० पीक-कापणीचीं यंत्रें आणि ५०० इतर प्रकारचीं अवजारें आहेत. त्यांच्या साह्यानें १५ हजार एकर जमिनीच्या प्रचंड शेतीचा कारभार करतां येईल. हीं अवजारें वापरण्यासाठी कामगार शिकवून तयार करावे लागतील.

**भारतामधील पुस्तक-प्रकाशन**—भारतांत प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकांची आंकडेवारी गोळा करण्याचें काम भारतीय सरकारच्या दळणवळण खात्यानें पहिल्याप्रथमच हातीं घेतलें आहे. ह्या कामासाठी एक कमिटी नेमण्यांत आली आहे. कमिटीनें पुस्तकांच्या प्रकाशकांसाठी एक आणि पुस्तक-विक्रेत्यांसाठी एक, अशा दोन प्रश्नावली तयार केल्या आहेत. पुस्तकांच्या प्रसिद्धीसंबंधीची माहिती मिळविण्यासाठी त्यांचें सहकार्य मागण्यांत आलें आहे.

**भूतानला जाणारे दोन रस्ते**—भारतीय सरकार भूतानला जाण्यासाठी दोन नवे रस्ते बांधणार आहे. दोन्ही रस्ते १९५७ अखेर तयार होतील. सध्यां भूतानला भारताशीं जोडणारा एकच रस्ता असून तो तिबेटमधील एका खोऱ्यांतून गेलेला आहे. खुद्द भूतानच्या प्रदेशांतहि मोटारी जाण्यायेण्यासारखा एकहि रस्ता नाहीं.

**पाकिस्तानला अमेरिकेची मदत**—येत्या फडणिशी वर्षांत पाकिस्तानला अमेरिकेकडून १० कोटी डॉलर्सपेक्षा अधिक आर्थिक मदत मिळण्याचा संभव आहे, असें त्या देशाच्या परराष्ट्रमंत्र्यांनीं जाहीर केलें आहे. त्याशिवाय अमेरिकेनें पुरस्कार केलेल्या आग्नेय-आशिआ संरक्षण-कराराच्या रकमेंतील कांहीं वांटाहि पाकिस्तानला मिळेल असें समजतें. चालू फडणिशी वर्षांत अमेरिकेनें पाकिस्तानला ११ कोटी डॉलर्सची मदत दिली आहे.

**महापंजाबची राजधानी**—प्रांतपुनर्रचना झाल्यावर अस्तित्वांत येणाऱ्या महापंजाबची राजधानी चंढीगड येथेंच राहील अशी वार्ता आहे. चंढीगड वसविण्यासाठी आतांपर्यंत १२ कोटी रुपये खर्च करण्यांत आले असून दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत त्या राजधानीच्या शहरावर आणखी ५० लाख रुपये खर्च करण्यांत यावयाचे आहेत.

**आंतरप्रांतीय विक्रीकर**—राज्यांतर्गत होणाऱ्या व्यापारांतील वस्तूंवर विक्रीकर बसविणें राज्य सरकारांना शक्य व्हावें म्हणून भारतीय सरकार घटनेच्या २८६ व्या कलमांत दुरुस्ती करण्याचा विचार करीत आहे असें समजतें. राज्य घटनेंत करावयाची दुरुस्ती कशा प्रकारची असावी ह्यासंबंधी राज्य सरकारांकडून मतेंहि मागविण्यांत आली आहेत.

**मदुरा शहरासंबंधीं बोलपट**—भारतीय सरकारच्या माहितीखात्यातर्फे मदुरा शहरांतील ऐतिहासिक महत्त्वाच्या ठिकाणाविषयीं अनुबोधपट तयार करण्यांत येत आहे. चित्रपटांत मदुरेच्या सुप्रसिद्ध मीनाक्षीमंदिराचा अर्थातच समावेश करण्यांत आला आहे. अशाच प्रकारचा एक माहितीपट तंजावर ह्या इतिहासप्रसिद्ध शहराविषयीहि तयार करण्यांत आला आहे.

**पश्चिम जर्मनींतील पोलादाचें उत्पादन**—पश्चिम जर्मनींतील पोलादाचें वार्षिक उत्पादन आतां ब्रिटनपेक्षा अधिक होऊं लागलें आहे. गेलीं कांहीं वर्षें पोलादाच्या उत्पादनाच्या बाबतींत ब्रिटनचा अनुक्रम तिसरा लागत होता तो आतां चौथा लागेल. १९५५ मध्यें पश्चिम जर्मनींतील कारखान्यांनीं २·१४ कोटी टन पोलादाचें उत्पादन केलें. १९५४ सालीं १·७४ कोटी टन पोलाद तयार करण्यांत आलें होतें.

**पार्लमेंटचें येतें अधिवेशन**—पार्लमेंटचें अंदाजपत्रकी अधिवेशन १५ फेब्रुवारी, १९५६ रोजीं सुरू होऊन ते ३१ मे, १९५६ अखेर चालेल, असा अंदाज आहे.

## २१ वर्षांपूर्वींचा 'अर्थ'

(१६-१-१९३५)

### जर्मन खेड्यांत चरख्याचें पुनरुज्जीवन

नात्सी पक्षाच्या 'लांड पोस्ट' ह्या नांवाच्या साप्ताहिकांत चरख्याच्या पुनः स्थापनेविषयीं नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या एका लेखांत आलेलें वर्णन वाचलें, म्हणजे हिंदी खेडेगांवांच्या परिस्थितीशीं ह्या बाबतींतील असलेलें साम्य ध्यानांत येतें. जर्मनींत कापूस पिकत नाहीं व तेथील खेड्यांतील चरख्यांवर लोकरीचें सूत काढण्यांत येतें. सध्यांच्या यांत्रिक युगांत चरख्याचा टिकाव लागणें शक्य नाहीं, असें वर उल्लेखिलेल्या लेखांत स्पष्ट म्हटलें आहे. तथापि, चरख्याच्या बाजूनें असें सांगण्यांत येत आहे कीं, आपणांकडील घोंगड्या व कांबळी ज्याप्रमाणें स्वस्त, सोयीच्या व सुबक वाटतात, त्याचप्रमाणें कांहीं जातीचें कापड जर्मनीमध्यें ग्राह्य वाटतें. घरीं सूत काढण्यानें पैशाची म्हणण्यासारखी कमाई होत नाहीं व त्या कामासाठी इतर गृहकृत्यांमुळें स्त्रियांस वेळहि मिळत नाहीं. पण जर्मनींत स्वतः पाळलेल्या मेंढ्यांच्या लोकरीचा घरींच उपयोग करणें सोईस्कर पडतें. शिवाय, संध्याकाळच्या रिकाम्या वेळीं चरखा चालत असतां त्याच्या भोंवतीं बसून गप्पागोष्टी करण्यानें शेतकऱ्यांच्या कुटुंबाची करमणूक होते. मुलांमुलींस आपल्या खेळांमुळें चरख्याकडे लक्ष देण्यास सवड होत नाहीं. अशा स्थितींतहि कुटुंब संस्थेचें एक अंग म्हणून चरख्याचें पुनरुज्जीवन व्हावें, अशी इच्छा जर्मनींत प्रकट केली जात आहे. ज्या थोड्या स्त्रियांस चरख्यावर सूत काढण्याची अजून संवय आहे, त्यांनीं स्वतःच्या उदाहरणानें इतरांस प्रोत्साहन द्यावें, अशी वरील जर्मन पत्रांत सूचना करण्यांत आली आहे. खेड्यांतील विशिष्ट प्रकारचें जीवन नष्ट होत चाललें आहे, त्यास चालना मिळावी हा सदरहू चळवळीचा हेतु आहे. सूत काढण्याच्या कामाशीं पुरुषवर्गाचा संबंध मात्र मुळींच आणलेला नाहीं, ही गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे. स्त्रियांचें काम स्त्रियांनीं करावें, पुरुषांचें काम पुरुषांनीं करावें, असा नात्सी लोकांचा दंडक आहे. त्यास ही वस्तुस्थिति धरून आहे.


# दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉम्पेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

# अर्थ

बुधवार, ता. ११ जानेवारी, १९५६





संस्थापक : प्रो. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे


## खाजगी बँकिंगच्या धंद्याचें भवितव्य

भारतीय सरकारचे अर्थमंत्री श्री. सी. डी. देशमुख ह्यांनीं मद्रास येथील इंडिअन बँकर्स असोसिएशन ह्या संस्थेपुढें बँकिंगच्या धंद्याविषयीं भाषण केलें. ते म्हणाले कीं, खाजगी उद्योगधंद्यांना वेगळं असें क्षेत्र आंखून देण्यांत आलें असून त्या अर्थ विभागाचें भवितव्य ज्याप्रमाणें चांगलें आहे त्याचप्रमाणें खाजगी व्यापारी बँकांचें भवितव्यहि आशादायक आहे. राष्ट्रीयीकरणाचें तत्त्व व्यापारी बँकांना लावण्याचा सरकारचा विचार नाहीं. खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांना अर्थव्यवस्थेंत जोंपर्यंत जागा आहे तोंपर्यंत त्या विभागाच्या गरजा खाजगी मालकीच्या बँकांनींच भागविल्या पाहिजेत. व्यापारी बँका ह्या खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांशीं निगडित झालेल्या असल्यामुळें त्या उद्योगधंद्यांच्या उत्कर्षावरच व्यापारी बँकांचा उत्कर्ष अवलंबून आहे. ग्रामीण भागांतहि व्यापारी बँकांनीं आपला धंदा वाढविण्यास हरकत नाहीं. स्टेट बँक ऑफ इंडिआनें ग्रामीण विभागांत ४०० नव्या शाखा उघडून पतीचे व्यवहार सुलभ करण्याचें ठरविलें आहे हें खरें आहे. पण तरीसुद्धां खाजगी व्यापारी बँकांना ह्या क्षेत्रांत वाव नाहीं, असें म्हणतां येणार नाहीं. एकंदरीनें विचार करतां देशांतील बँकिंगचा धंदा चांगल्या अवस्थेंत आणि बळकट पायावर उभा आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. तथापि, तो अगदीं आदर्श पद्धतीनें चालविण्यांत येत आहे असें मात्र नव्हे. ह्या धंद्याच्या व्यवहारांत बारीकसारीक पुष्कळच दोष आहेत. बँकांजवळ असणारा पैसा हा अखेरीस लोकांचाच पैसा आहे. पण ह्या पैशाचा दुरुपयोग केला गेल्याचीं उदाहरणें बऱ्याच वेळां आढळून येतात. हीं उदाहरणें म्हणजे झोपी गेलेल्या माणसाला एकदम धक्का देऊन जागे करण्यापैकीच प्रकार आहे.

---

## काटकसरीच्या जीवनाची आवश्यकता

भारताचे अर्थमंत्री श्री. चिंतामणराव देशमुख ह्यांनीं दुसरी पंचवार्षिक योजना यशस्वी करण्यासाठी काटकसरीच्या व साध्या जीवनाची आवश्यकता प्रतिपादिली आहे. वैयक्तिक जीवनांत अगर सामाजिक जीवनांत अशा प्रकारच्या आयुष्य-क्रमाला महत्त्वाचें स्थान आहे ह्यांत शंका नाहीं. कारण, जितके लोक संयमी जीवन जगण्याचा प्रयत्न करतील त्या मानानें पैशाची बचत होऊन भांडवलाचा संचय होईल हें उघडच आहे. भारतानें आर्थिक नियोजन अंगीकारून प्रगति करण्याचें ठरविलें आहे. कोणत्याहि प्रकारची नियुक्त अर्थव्यवस्था त्यागवृत्ती-शिवाय यशस्वी होऊं शकत नाहीं, हें अर्थशास्त्रीय तत्त्व आतां सर्वमान्य झालेलें आहे. पण हा त्याग कोणीं करावा ह्याबद्दल अधिक विचार होणें जरूर आहे. वर्तमानकालाची गरज पुढें ढकलून बचत करणें, नफा व वेतन ह्यांच्यांतील कपाती खुषीनें स्वीकारणें, दीर्घ कालपर्यंत काम करणें अगर चैनीच्या वस्तूं-शिवाय भागविणें, ही सर्व जबाबदारी कांहीं थोड्या लोकांनींच उचलावी असा अर्थ अलीकडे करण्यांत येऊं लागला आहे. भारतामधील सामान्य माणसांचीहि ह्या बाबतींत कांहीं कर्तव्यें आहेत ह्याचा विसर पडूं लागलेला दिसतो. उत्पादनाच्या बाबतींत पूर्वी असलेली विषमता आतां कमी कमी होऊं लागली आहे. म्हणून सामान्य नागरिकानेंसुद्धां बचत करणें हें आपलें एक कर्तव्य मानलें पाहिजे. त्याचप्रमाणें, आपल्या वांट्याला आलेलें कोणतेंहि काम चोख बजाविण्याची दक्षताहि त्यानें घेतली पाहिजे. चैनी व विलासी रहाणीविरुद्ध एक प्रकारचें परिणाम-कारी लोकमत तयार करण्याचीहि आवश्यकता आहे. ह्या बाबतींत सरकारनें आपल्या कारभारांत सुधारणा करून बचतीचें तत्त्व पाळणें जरूर आहे.

---

## बोट–वहातुकीसाठी स्वतंत्र खातें

पार्लमेंटमधील काँग्रेस पक्षाच्या वहातुक–कमिटीनें बोटींच्या वहातुकीसाठी एक स्वतंत्र सरकारी खातें निर्माण करण्यांत यावें अशी सूचना केली आहे. अशा प्रकारचें स्वतंत्र खातें निर्माण करण्यांत आलें तरच प्रगतिप्रद अशी बोटवहातूक करतां येऊं शकेल, असें मत कमिटीनें व्यक्त केलें आहे. कमिटीनें ह्या विषयासंबंधीं एक प्रबंध भारताच्या नियोजन समितीकडे पाठविला आहे. प्रबंधांत असें म्हटलें आहे कीं, पहिल्या पंचवार्षिक कार्य-क्रमांत ६,००,००० टन वजनाच्या बोटींचें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें होतें. १९५६ अखेर हें उद्दिष्ट गांठावयाचें होतें. परंतु आज भारताजवळ फक्त ४,००,००० टन वजनाच्याच बोटी आहेत. ह्यापैकीं ३,८५,००० टन वजनाच्या बोटी पहिली योजना सुरू होण्यापूर्वीच्या होत्या. ह्याचा अर्थ असा कीं, १९५६ च्या मार्चअखेर २,१५,००० टन वजनाच्या बोटींची भर पडावयास हवी आहे. प्रत्यक्षांत मात्र ९५,००० टन वजनांच्या नव्या बोटी तयार करण्यांत आल्या आहेत. म्हणजे, ठरलेल्या उद्दिष्टापेक्षा अजून १,२०,००० टन वजनाच्या बोटी कमी आहेत. पहिल्या योजनेंत ठरविलेलें उद्दिष्टच मुळांत फारसें उच्च नव्हतें; आणि त्यापैकीं फक्त ४० टक्केच उद्दिष्ट गांठण्यांत आलेलें आहे. ही प्रगति अत्यंत असमाधानकारक आहे. जपान, जर्मनी व इटली ह्या देशांशीं ह्या बाबतींत तुलना करतांना तर ही गोष्ट विशेषच लक्षांत येतें. ह्या देशांच्या बोटींपैकीं लक्षावधि टन वजनाच्या बोटी दुसऱ्या महायुद्धांत बुडाल्या. परंतु गेल्या दहा वर्षांत त्यांनीं आपली सर्व नुकसानी तर भरून काढलीच, पण त्यापेक्षाहि थोड्या अधिक बोटी त्यांनीं नव्यानें बांधल्या. नियोजन–समितीनें दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत बोटी बांधण्यासाठीं निदान ८० कोटी रुपये तरी मंजूर करावेत, अशी सूचना कमिटीनें केली आहे.

**दिल्ली येथील प्रदर्शनांतील माल**—दिल्ली येथें भरलेल्या औद्योगिक प्रदर्शनांतील आपला माल भारतांतच विकण्याची परवानगी यावी, अशी विनंती बऱ्याच परदेशांकडून भारत सरकारला करण्यांत आली होती. भारतीय सरकारनें आपल्या आयात–विषयक धोरणाचा विचार करून असे बरेच परवाने दिले आहेत.

## किर्लोस्कर ब्रदर्स लि., किर्लोस्करवाडी

वरील कंपनीनें ३१ जुल, १९५५ अखेर संपलेल्या वर्षी १,३८,९९० रु. निव्वळ नफा मिळविला. कराच्या तरतुदीसाठी २,००,००० रुपये काढून व ५,१४,०९५ रुपये घसारा काढूनच हा नफा राहिलेला आहे. भागदारांना ५% डिव्हिडंड मिळणार आहे.

अहवालाचे वर्षी कंपनीला म्हैसूर किर्लोस्कर लि., हरिहरकडून मॅनेजिंग एजन्सी कमिशनचे व अलावन्सचे ७३,६९६ रु. मिळाले. किर्लोस्कर इलेक्ट्रिक कं लि., बंगलोरकडून किर्लोस्कर सन्स अँड कं. ला मिळालेल्या कमिशनमध्यें किर्लोस्कर बंधु लि., ला ८,७२९ रु. वाटा मिळाला; आणि डिव्हिडंड व व्याज ह्या रूपानें ६१,७९६ रु. मिळाले. कंपनीचें वसूल भांडवल २२,९६,८९३ रु. असून रिझर्व्ह व इतर फंडांत ४६,६९,९२१ रु. आहेत आणि कर व ग्रॅच्युटीसाठी १२,३४,२२६ रुपयांची तरतूद आहे. कंपनीनें आजवर ५१,७५.६०० रुपयांचा घसारा काढलेला आहे. कर्ज व ठेवीखातीं १२,६३,२६३ रुपये आहेत. एकूण ताळेबंद १,५५,३४,७५८ रुपयांचा आहे.

---

## निसर्गोपचार-पद्धतीची शिफारस

कलकत्ता येथें अखिल भारतीय निसर्गोपचार परिषदेचें पहिलें अधिवेशन भरविण्यांत आलें होतें. परिषदेला भारतामधील ठिक-ठिकाणच्या निसर्गोपचार केंद्राहून १०० प्रतिनिधी आलेले होते. उरुळी कांचन येथें महात्मा गांधींनीं स्थापन केलेल्या निसर्गोपचार केंद्राचे चालक श्री. भावे ह्यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारलें होतें. काँग्रेसचे अध्यक्ष श्री. धेबर परिषदेचें उद्घाटन करतांना म्हणाले कीं, जनतेच्या दृष्टीनें विचार करतां निसर्गोपचार ही पद्धति योग्य अशा तत्त्वावर आधारलेली आहे. मानवी रोगांचें निवारण करणारी ही पद्धति अशी आहे कीं, साधी व निसर्गाशीं सुसंवादी अशी राहणी ठेवली तरच ती प्रभावी होते. मनुष्याच्या शरीराकडे पहाण्याचा तिचा असा एक विशिष्ट दृष्टिकोन आहे. मानवी शरीर हें सुख व विलास भोगण्याचें एक साधन आहे असें ती मानत नाहीं. मनुष्याचें शरीर ह्यापेक्षा अधिक चांगल्या कामाकरतां अस्तित्वांत आलें आहे असें निसर्गोपचाराचें म्हणणें आहे. हें काम म्हणजे मानवी समाजाची सेवा. परिषदेचे अध्यक्ष श्री. भावे आपल्या भाषणांत म्हणाले कीं, सध्यां ॲलोपॅथी, आयुर्वेद आणि इतर कांहीं औषधपद्धती प्रचारांत आहेत. ह्या उपचारपद्धतींत रोग्याला जीं औषधें देण्यांत येतात त्यांचा परिणाम म्हणून रोग्याच्या शरीरांत विषारी द्रव्यें तशींच राहून जातात. ह्या विषारी द्रव्यांचा नंतर वाईट परिणाम होतो. उलट पक्षीं, निसर्गोपचार पद्धतींत रोगांवर असे इलाज करण्यांत येतात कीं त्यांच्यामुळें शरीरांत कोठल्याहि प्रकारचीं विषारी द्रव्यें राहात नाहींत. त्याचप्रमाणें रोगापासून मुक्त झालेल्या रोग्याला आपली पुढील जीवनचर्या त्यानें कशा प्रकारची ठेवावी ह्याविषयीं सूचना देण्यांत येतात. दिलेल्या सूचनांप्रमाणें रोगी वागल्यास तो त्याच रोगाच्या तावडींत पुन्हां सांपडण्याचा संभव फार कमी असतो.

---

## पाकिस्तानांत जपानी कापडाची आयात

अमेरिकेच्या मदतीनें पाकिस्तानांत जपानी कापडाची आयात होऊं लागली आहे. ही प्रवृत्ति वाढल्यास, भारताच्या निर्गतीवर प्रतिकूल परिणाम होईल.

## समाजवाद व राष्ट्रीयीकरणाची जरूरी

भारताच्या स्टेट बँकेचे अध्यक्ष डॉ. जॉन मथाई ह्यांनीं मुंबई येथें समाजवादी पद्धतीची समाजरचना व धंद्यांचें राष्ट्रीयीकरण ह्या विषयासंबंधी महत्त्वाचे विचार व्यक्त केले आहेत. श्री. मथाई म्हणतात कीं, समाजवादी वळणाची समाजरचना अंतर्भूत असलेलीं सर्व ध्येयें इतर मार्गांनीं गांठतां येण्यासारखीं आहेत. समाजवादांत उद्योगधंद्यांतील खाजगी पुढाकाराला दाबून टाकण्याचा भाग प्रमुख आहे असें नाहीं. समाजवादाला जवळ असणारी समाजरचना युरोप, ब्रिटन व रशिआ ह्या ठिकाणीं अस्तित्वांत आहे. तथापि सर्व ठिकाणच्या समाजवादांत सर्व-सामान्य असें उद्दिष्ट आढळून येत नाहीं. तरीपण कांहीं कल्पना मात्र समान असलेल्या आढळून येतात. ह्या निरनिराळ्या प्रकारच्या समाजवादी संघटना व त्यांच्यामागें असलेली विचारांची प्रेरणा लक्षांत घेतली तर आपणांस दोन बाबींकडे प्रामुख्यानें लक्ष दिलेलें आढळून येईल. स्वातंत्र्य आणि समता ह्या त्या दोन बाबी होत. अर्थात्, विवक्षित समाजरचनेंत त्यांचा किती आविष्कार होतो व प्रत्यक्ष धोरणांत त्या किती प्रभावी होतात, हा स्वतंत्र प्रश्न आहे. तथापि चर्चेकरितां म्हणून समाजवादाची कामचलाऊ व्याख्या करतां येण्यासारखी आहे. माझ्या मतानें समाजवादाची कल्पना ही धार्मिक कल्पनेसारखी नाहीं किंवा निश्चित स्वरूपाची अशी एखादी संघटनाहि त्या कल्पनेंत अभिप्रेत नाहीं. समाजवाद हा जीवितविषयक ध्येयमार्ग आहे. समाजाविषयीं एक विशिष्ट वृत्ति त्या कल्पनेंत आहे. सामाजिक न्यायाचा समाजाच्या सर्व थरांत अधिकांत अधिक प्रसार व्हावा ही भावना त्या वृत्तीच्या मुळाशीं आहे, असें मला वाटतें.

## रसाच्या मळीपासून गोड पाक

नुकत्याच झालेल्या इंडिअन सायन्स काँग्रेसमध्यें काँग्रेसच्या निरनिराळ्या विभागाकडे १२,००० संशोधनात्मक प्रबंध आले होते. तथापि, त्यांपैकी ३०० प्रबंध औद्योगिक व शुद्ध-रासायनिक होते हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. ह्यावरून रसायनविषयक संशोधनाकडे संशोधकांचें अधिक लक्ष आहे असें दिसून येतें. ह्या शाखेनंतर वैद्यकीय आणि गुरांच्या शास्त्राविषयींच्या संशोधनात्मक प्रबंधांचा अनुक्रम लागतो. वैद्यकीय प्रबंधांत ॲड्रेनॅलिन ह्या द्रव्याचा मनुष्याच्या हृदयावर काय परिणाम होतो तो सांगणारा असा एक प्रबंध आहे. मधुमेह ह्या रोगाविषयीं काँग्रेसमध्यें बरीच चर्चा झाली. ह्या रोगावरील चर्चेंत डॉ. हौसे ह्या अर्जेंटायनामधील एका डॉक्टरांनीं प्रामुख्यानें भाग घेतला होता. मधुमेहाचा अभ्यास करण्यांत डॉ. हौसे यांनीं आपलें सर्व आयुष्य आतांपर्यंत वेंचलें आहे. श्री. के. जी. भाटिआ व श्री. मुखर्जी ह्या दोन भारतीय संशोधकांनीं उसाच्या रसाच्या मळीविषयीं एक प्रबंध रसायन-विभागाकडे सादर केला आहे. त्यांच्या मतानें ह्या मळीपासून खाण्यास योग्य अशा प्रकारचा टिकाऊ पाक बनवितां येण्यासारखा आहे. आतांपर्यंत असें समजण्यांत येत असें कीं, रसाची मळी ही साखरेच्या धंद्यापासून निघूं शकणारी एक अनुपयुक्त वस्तु आहे. मळीचा उपयोग करून तीपासून मोटारींना लागणारें पेट्रोलसारखें इंधन तयार करण्याचे बरेच प्रयत्न आतांपर्यंत करण्यांत आले आहेत. पण ते फारसे यशस्वी झालेले नाहींत. तथापि, रसाच्या मळीपासून पक्का गोड पाक बनविण्यांत संशोधकांच्या मताप्रमाणें यश आलें तर त्यापासून बऱ्याच जिनसा तयार करतां येतील असा संभव आहे.

## किर्लोस्कर इलेक्ट्रिक कं. लि., बंगलोर

[ श्री. सी. आर. श्रीनिवासन्, चेअरमन, ह्यांचें कंपनीच्या २७ डिसेंबर १९५५ रोजीं झालेल्या सभेंतील भाषण. ]

"ही कंपनी २६ जुलै, १९४६ रोजीं नोंदण्यांत आली. कंपनीनें १९४८ मध्यें इलेक्ट्रिक मोटारींच्या उत्पादनास प्रारंभ केला. त्याची प्रगति खालीं दिली आहे:—

| वर्ष | हॉर्सपॉवर |
|---|---|
| १९४८-४९ | ३,२०० |
| १९४९-५० | १०,९०० |
| १९५०-५१ | २१,७०० |
| १९५१-५२ | २७,९०० |
| १९५२-५३ | ३४,९०० |
| १९५३-५४ | ४१,८०० |
| १९५४-५५ | ५९,३०० |

१९५०-५१ मधील उत्पादनाची किंमत ६.०१ लक्ष रुपये होती, ती १९५४-५५ मध्यें ४२.८ लक्ष रुपये झाली. १९५४-५५ मध्यें १०.७५ लक्ष रुपयांचे ट्रॅन्सफॉर्मर्सहि तयार करण्यांत आले. म्हणजे त्या वर्षी एकूण उत्पादन ५१.५ लक्ष रुपयांचें झालें.

" किर्लोस्कर इलेक्ट्रिक कंपनीचें इलेक्ट्रिक मोटारींचें उत्पादन १९५२ मध्यें भारतांतील एकूण उत्पादनाच्या १७.५३% होतें, तें १९५३ मध्यें २२.१६% व १९५४ मध्यें २८% झालें. इलेक्ट्रिक मोटारींचें उत्पादन करणारे भारतांत १२ कारखाने आहेत, त्यांपैकीं एकटा हा कारखाना २८% उत्पादन करीत आहे. कोणत्याहि आयात केलेल्या इलेक्ट्रिक मोटारींची ह्या मोटारी बरोबरी करतात. ट्रॅन्सफॉर्मर्सची मागणी उत्पादनापेक्षा कितीतरी अधिक आहे. इलेक्ट्रिक मोटारी व ट्रॅन्सफॉर्मर्स ह्यांची भारतांतील बाजारपेठ एकसारखी वाढती आहे, तिला अनुसरून उत्पादनहि विविध प्रकारचें करण्यांत येत आहे. बाजारपेठेच्या दृष्टीनें ह्या धंद्याची परिस्थिति अत्यंत समाधानकारक असली तरी आवश्यक त्या कच्च्या मालाचा पुरवठा व त्याची वहातुक, ह्या बाबतींत बरीच सुधारणा होणें अगत्याचें आहे. अर्थात्, सरकारचें ह्या धंद्याकडे लक्ष आहे. ५० हॉर्स पॉवरपर्यंतच्या मोटारींच्या आयातीस त्यानें बंदी केलेली आहे व ५० ते ७५ हॉर्स पॉवरच्या मोटारींच्या आयातीवर नियंत्रणें आहेत. टॅरिफ कमिशननें १९५८ अखेर संरक्षणाची शिफारस केली आहे व तें १०० हॉर्स पॉवरपर्यंतच्या मोटारींस मिळावें, असें सुचविलें आहे. संरक्षक जकात १० ची १५% केली आहे. सरकारनें ह्या सर्व शिफारसींना मंजुरी दिली आहे."

श्री. श्रीनिवासन् ह्यांनीं आपल्या भाषणांत नंतर खेळत्या भांडवलाच्या वाढत्या गरजेचा उल्लेख केला व १० लाखांचे नवे शेअर्स विक्रीस काढण्यांत येतील, ते भागीदारांना आधीं देऊं केले जातील असें सांगितलें.

कंपनीला ३० जून, १९५५ अखेर संपलेल्या वर्षी ११,४६,२०९ रु. ठोक नफा झाला. ३,१९,११० रु. घसारा काढून, १,३४,३७० रु. व्याज देऊन व डेव्हलपमेंट रिझर्व्हसाठी १,१२,३५९ रु. ची तरतूद करून, कंपनीनें १,१५,३७१ रु. केवळ नफा मिळविला आहे. सर्व तरतुदी गेल्या वर्षापेक्षा ज्यास्त प्रमाणावर करूनहि, नफ्यांत भरघोस वाढ झालेली आहे.

## आपली पत कशी वाढवाल ?

सारस्वत को. बँक लि. नें "आपली पत कशी वाढवाल" ही पुस्तिका सभासदांसाठी तयार केली आहे. कर्जाचा उपयोग कसा करावा व तें फेडण्यासंबंधीं कोणती दृष्टि ठेवावी, ह्याचें हें प्रस्तुत विवेचन असून त्याच पद्धतीचीं आणखी पत्रकें काढून सभासदांना मार्गदर्शन करण्याचा सारस्वत को. बँकेचा उद्देश आहे. सारस्वत बँकेच्या प्रगतिपर व सभासदांचा खरा हितकर्ता ह्या नात्यानें मदत करावयाच्या धोरणास अनुसरूनच ही पुस्तिका काढलेली आहे.

" कर्ज घेण्यासाठी जेव्हां आपण अर्ज करतों, तेव्हां आपल्या हिशेबीं कर्ज मिळविणें हीच गोष्ट महत्त्वाची असते, त्याकरतां मोठ्यामोठ्या हप्त्यांनीं आपण कर्जफेड करूं अशी आपण ग्वाही देतों व मोठे हप्ते स्वखुषीनें मान्य करतों. हे हप्ते आपणाला वक्तशीर भरतां येतील कीं नाहीं याचा आपण विचारहि करीत नाहीं. इतकेंच नव्हे, तर मोठा हप्ता एकदम भरतां येत नाहीं म्हणून कर्जापोटीं कांहीं तरी शक्य तितकी रक्कम भरणा करावी इतकेंहि आपण करीत नाहीं. ह्या वृत्तींत सुधारणा व्हावयाची असल्यास कर्जाचा हप्ता आपल्याला परवडेल इतका ठरवून घ्यावा; पण तो नियमीतपणें भरावा. कांहीं कारणानें एखादा हप्ता संपूर्ण भरणें शक्य नसल्यास आपल्याला जितकी रक्कम भरतां येणें शक्य आहे तितकी भरावी व आपली खरी परिस्थिति बँकेपुढें मांडावी." असें श्री. वा. पुं. वर्दे, बँकेचे अध्यक्ष, ह्यांनीं आपल्या प्रस्तावनेंत म्हटलें असून, कर्जदार-सभासदांना योग्य त्या सवलती दिल्या जातील, असें आश्वासन दिलें आहे.

प्रस्तुत पुस्तिका अगदीं सोप्या, सहज पटणाऱ्या भाषेंत लिहिलेली असून भरपूर अशा सूचक चित्रांनीं ती आकर्षक करण्यांत आली आहे. पुस्तिका सातच पृष्ठांची असली, तरी त्यांतील तत्त्वें फारच महत्त्वाचीं व मार्गदर्शक आहेत. उदाहरणार्थ,

" १. तुमचें एकंदर कर्ज आहे त्याहून जास्त रकमेचा विमा उतरला पाहिजे. म्हणजे, अकालीं मृत्यु आल्यास कुटुंबावर कर्जाचा बोजा पडणार नाहीं.

" २. अडीअडचणीसाठीं व आजारासाठीं दर महिन्याला नियमितपणें बचत करून कमींत कमी उत्पन्नाचा १/१० भाग तरी बाजूला काढून ठेवला पाहिजे. आपला पगार तेवढा कमी आहे असें समजून खर्चाचें प्रमाण ठरविलें पाहिजे.

" उधारीवर राहावयाचें असेल तर खालील चार नियम लक्षांत ठेवले पाहिजेत; तरच तुमची चांगली पत राहूं शकेल.

१. कर्जफेड करण्याच्या शक्तीबाहेर कधींहि कर्ज काढूं नये.

२. उधारी असेल तर ती फारच थोड्या प्रमाणांत असावी.

३. उधार घेतलेल्या मालाचीं बिलें अगदीं वक्तशीरपणें भरलीं पाहिजेत. कर्जाचे हप्ते सुद्धां अगदीं वेळच्या वेळेवर भरले पाहिजेत. एखाद्या महिन्यास तें शक्य न झाल्यास आपली परिस्थिति आपल्या धनकोपुढें प्रामाणिकपणें मांडावी; म्हणजे त्यांतून कांहीं तरी तोड काढतां येत असते.

४. बँकेकडून कर्ज काढलें असल्यास त्याचे हप्ते अगदीं वक्तशीरपणें भरले पाहिजेत. उदाहरणार्थ, १०० रुपयांचा हप्ता घेऊन तो वक्तशीरपणें भरतां येत नसल्यास ५० रुपयांचा हप्ता घ्यावा; पण तो अगदीं न चुकतां भरावा."

## लवादबोर्डावर प्रतिनिधी पाठवणेचा अधिकार

### सर्व पक्षकारांना आहे काय ?

लेखक : स. वा. कुलकर्णी, बी. ए., एलएल. बी., पुणें.

मुंबई सहकारी सोसायट्यांच्या १९२५ च्या कायद्यान्वयें कलम ५४ यांत नमूद केलेप्रमाणें उपस्थित होणाऱ्या लवाद दाव्यांचा निर्णय होणेसाठी अशा स्वरूपाचे दावे रजिट्रार्स नॉमिनी-कडे पाठविले जातात. सदरच्या दाव्यांचा निर्णय करतांना सदरचे कायद्याखालील कानू ३२ अन्वयें नमूद केलेल्या तंत्राचा अवलंब नॉमिनीस करावा लागतो; व संबंधी पक्षकारांना सदरचा दावा लवादबोर्डापुढें चालवावयाचा आहे किंवा कसें हे नॉमिनीस कळवून लवादबोर्डाची मागणी करणेचा हक्क सदरचे कानून्वयें सर्व पक्षकारांना दिलेला आहे. संबंधी पक्षकारांनीं लवादबोर्डाची मागणी न केल्यास सदरच्या दाव्याचा निर्णय नॉमिनीस देतां येतो. परंतु एकाद्या पक्षकारानें लवादबोर्डाची मागणी करून लवादबोर्डापुढें सदरचा दावा चालवावा अशी इच्छा व्यक्त केल्यास लवादबोर्ड अस्तित्वांत आलेखेरीज एकट्या नॉमिनीस सदरचा लवाददावा चालवतां येत नाहीं व निर्णय देतां येत नाहीं. लवादबोर्डाची मागणी कोणी एका पक्षकारानें केलेवर दुसऱ्या बाजूकडील सर्व पक्षकारांना लवादबोर्डावर काम करणेसाठी प्रतिनिधीचें नांव नॉमिनीस सुचवावें लागतें. एकादे वेळीं एका बाजूकडील पक्षकारांनीं अगर त्यांतील एका पक्षकारानें लवादबोर्डाची मागणी करून कानू ३२ अन्वयें सांगितलेल्या विशिष्ट मुदतींत नॉमिनीस कळवलें असतां दुसऱ्या बाजूकडील पक्षकारांनीं त्याबाबत कांहींहि हालचाल केली नाहीं तर त्या परिस्थितींत मे. असिस्टंट रजिष्ट्रार को. सो. हे त्या बाजूकडील पक्षकारातर्फे प्रतिनिधीचें नांव देऊन त्याची नेमणूक करून लवादबोर्ड तयार करतात.

वर उल्लेख केलेप्रमाणें कानू ३२ अन्वयें संबंधी पक्षकारांना लवादबोर्डावर प्रतिनिधी देणेचा हक्क दिलेला आहे. कांहीं लवाद-दाव्यांत एका बाजूस एकापेक्षा जास्त पक्षकार असूं शकतात व अशावेळीं एका बाजूकडील कोणाहि पक्षकारानें लवादबोर्डाची मागणी केलेवर त्याच बाजूंतील उरलेल्या पक्षकारांना स्वतंत्र प्रतिनिधी लवादबोर्डावर पाठवितां येतील किंवा काय ह्याचा विचार ह्या लेखांत करण्याचें योजिलें आहे. कानू ३२ अन्वयें ज्यावेळीं एका बाजूस एकापेक्षा जास्त पक्षकार लवाददाव्यांत सामील असतात त्यावेळीं सदरचे कानूंत सांगितलेप्रमाणें "प्रमुख पार्टीस" लवादबोर्डावर प्रतिनिधी पाठवणेचा हक्क राहील व अशा परिस्थितींत "प्रमुख पार्टी" कोण हें ठरविणेचा अधिकार मे. रजिष्ट्रारसाहेब यांचेकडे राहील व त्यांचा निर्णय हा अखेरचा समजला जाईल, असें म्हटलें आहे. मूळ कानू इंग्रजींत असून त्यांत "प्रिन्सिपल पार्टी" असे शब्द आहेत. कानू ३२ अन्वयें उल्लेख केलेल्या कलमांची छाननी करतांना "पार्टी" या शब्दास अतिशय महत्त्व प्राप्त झालेलें आहे व त्याचा अर्थ लावतांना निरनिराळे विवाद्य मुद्दे उपस्थित होत आहेत. कांहींनीं सदरच्या "पार्टी" या शब्दाचा अर्थ "बाजू" असा गृहीत धरलेला आहे. उदाहरणार्थ "वादीची बाजू" अगर "प्रतिवादीची बाजू" व इतर कांहींनीं त्या शब्दाचा "पक्षकार" असा अर्थ लावलेला आहे. कांहीं दिलेल्या निवाड्यानुसार सदरचे कानू ३२ मधील कांहीं भाग हा नियमबाह्य असून सदरच्या निर्णयान्वयें मे. रजिष्ट्रारसाहेब यांना "प्रिन्सिपल पार्टी" कोण हें ठरविणेचा व त्यालाच लवादबोर्डावर प्रतिनिधी पाठवणेचा हक्क आहे हें ठरविणेचा अधिकार नाहीं. मुंबई सरकारनें सदरचे कायद्यान्वयें केलेल्या कानू ३२ मधील कांहीं भाग हा कलम ५४ मधील कांहीं भागाशीं विसंगत आहे. वरील निवाड्यामुळें कानू ३२ अन्वयें नोटीसा काढलेवर ज्या लवाददाव्यांत एकापेक्षा जास्त पक्षकार आहेत अशा दाव्यांत लवादबोर्डावर काम करणेसाठी म्हणून प्रत्येक पक्षकार आपआपला प्रतिनिधी पाठवणेचा आग्रह धरतो. अशा परिस्थितींत कलम ५४ यांत नमूद केलेप्रमाणें लवादबोर्ड ३ सदस्यांचें न होतां जितके पक्षकार लवादबोर्डावर काम करणेस आपआपले प्रतिनिधी पाठवतील तितके सदस्य अधिक रजिष्ट्रार्स नॉमिनी, इतक्यांचें लवादबोर्ड तयार होईल व त्यामुळें अनावस्था प्रसंग निर्माण होणेची शक्यता आहे. ज्या मंडळींनीं "पार्टी" या शब्दाचा अर्थ "बाजू" असा गृहीत धरलेला आहे त्यांच्या मतानें प्रत्येक पक्षकारास प्रत्येकाचा स्वतंत्र प्रतिनिधी लवादबोर्डावर पाठविणेचा हक्क नाहीं. उदाहरणार्थ, आपण असें समजूं कीं, वादीचे बाजूंत ५६ वादी सामील पक्षकार आहेत व प्रतिवादीचे बाजूंत ५६ प्रतिवादी आहेत. "पार्टी" शब्दाचा "बाजू" अर्थ लावणाऱ्या मंडळींचें म्हणणें असें कीं वादीबाजूकडील सर्व पक्षकारांनीं मिळून एक प्रतिनिधी लवाद-बोर्डावर पाठवावयाचा व प्रतिवादीपक्षाकडील सर्व पक्षकारांनीं मिळून दुसरा प्रतिनिधी लवादबोर्डावर नेमावयाचा व रजिष्ट्रार नॉमिनी हा चेअरमन असें धरून तीन सदस्यांचें लवादबोर्ड तयार होऊन ते ५४ कलमाशीं सुसंगत असें असलेमुळें त्या कलमांत दुरुस्ती करणेचीहि जरूरी नाहीं. ह्याबाबत पुढें विचार करून असेंहि म्हणतां येईल कीं, वादीपक्षांतील मंडळींनीं लवाद-बोर्डाची मागणी करून प्रतिवादीपक्षानें त्याप्रमाणें जरी लवाद-बोर्डाची मागणी केली नाहीं तरी मे. रजिष्ट्रारसाहेब यांना सदरचे कानू ३२ अन्वयें प्रतिनिधी न नेमणाऱ्या बाजूतर्फे मे. रजिष्ट्रार यांच्या मनास वाटेल तो प्रतिनिधी नेमणेचा अधिकार सदरचे कानूनें रजिष्ट्रार यांना आहे. वर उल्लेख केलेप्रमाणें "पार्टी" या शब्दाचा अर्थ "बाजू" असा धरून त्याआधारें केलेली रचना जरी सयुक्तिक दिसत असली तरी प्रत्यक्षांत त्याचा फायदा संबंधित पक्षकारांना मुळींच होत नाहीं. एका बाजूंतील सर्व पक्षकारांनीं मिळून एक प्रतिनिधी निवडावा असें ज्यावेळीं आपण म्हणतों त्यावेळीं त्या पक्षकारांचे सदरचे लवाददाव्यांतील हक्कहितसंबंध विरोधी नसतील तरच शक्य आहे, एरवीं नाहीं. एका बाजूंतील पक्षकारांचे हक्कहित-संबंध जर परस्परांचे हितसंबंधाविरुद्ध असतील तर त्या सर्वांचे-तर्फे एक एक प्रतिनिधी लवादबोर्डावर पाठवणेची सुतराम शक्यता नाहीं व दावा म्हटला कीं परस्परविरोधी हितसंबंध असणारच. एका बाजूनें प्रतिनिधी पाठवून लवादबोर्ड मागितले व दुसऱ्या बाजूनें लवाद बोर्डाची मागणी केली नाहीं अगर आपसांतील मतभेदामुळें प्रतिधिधी पाठवणेबाबत एक-वाक्यता झाली नाहीं तर रजिस्ट्रारसो. यांना अशा प्रसंगीं लवाद-बोर्डावर प्रतिनिधी पाठवणेचा हक्क आहे; परंतु असें करतांना सदरचे कायद्यान्वयें लवादबोर्डाची मागणी करून प्रतिनिधी देणेचा जो स्वतंत्र हक्क प्रत्येकास दिलेला आहे तो या मार्गानें हिरावून घेतला जात आहे.

कानू ३२ अन्वयें सांगितलेल्या तंत्राचें पालन नॉमिनीनें योग्य तऱ्हेनें न केल्यास दिलेले निकाल ट्रायब्युनलपुढें फिरणेची शक्यता जास्तच असते; कारण त्यायोगें पक्षकारांचे मूलभूत हक्क हिरावून घेतले जातात. ह्याबाबत सहकारी कायद्याच्या सर्व अभ्यासूंनीं ह्या मूलभूत प्रश्नावर विचार केंद्रित करावयास हवे आहेत.

## कण आणि क्षण

लेखक :—श्रीयुत श्री. वा. काळे, संपादक "अर्थ"

पृ. सं. १६८] दुसरी मराठी आवृत्ति [किंमत रु. २॥

"या पुस्तकांत ३० लघुनिबंध आहेत. निबंधाचे विषय दररोजच्या आयुष्यक्रमांतील आहेत. मनुष्यानें कुटुंबांत व समाजांत कसें वागावें याबद्दल केलेलें विवेचन व उपदेश हीं तरुण पिढीला मार्गदर्शक होतील यांत शंका नाहीं. लेखकाचें समाजाचें अवलोकन सूक्ष्म आहे. मध्यम स्थितींतील पांढरपेशी वर्गाच्या जीवनाचें चित्र लेखकानें सुंदर रेखाटलें आहे. या वर्गांतील लोकांचे आचार, विचार, संसारांतील अडचणी, त्यांचे गुण, त्यांचे दोष, हीं सर्व लेखकाला सुपरिचित आहेत. गरीब स्थितींत असूनहि धीरानें, सौजन्यानें व दक्षतेनें वागून आपलें कर्तव्य पार पाडणाऱ्या व कुटुंबाला व समाजाला सुखी करणाऱ्या सुगृहिणींचीं चित्रें लेखकानें मोठ्या कौशल्यानें रेखाटलीं आहेत. लेखकाची भाषा साधी, सोपी व आंधवती आहे. विनोद मार्मिक आहे, पण तो बोचक नाहीं. प्रत्येकानें आपलें, आपल्या कुटुंबाचें व समाजाचें सुख वाढविण्याकरितां क्षणाक्षणाचा व कणाकणाचा सदुपयोग केला पाहिजे, हे लेखकानें पुस्तकांत ठिकठिकाणीं दाखविलें आहे.":—महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्थेनें, दक्षिणा प्राइझ फंडांतून बक्षिस देतांना केलेलें परीक्षण.

### दिल्ली येथें प्रचंड होटेल

न्यू इंडिया विमा कंपनी आणि दि कॉनरॅड हिल्टन कॉर्पोरेशन हीं अमेरिकन कंपनी ह्यांच्या सहकार्यानें नव्या दिल्लींत एक प्रचंड होटेल उघडण्यांत येणार आहे. दिल्ली ही जगांतील राजधान्यांत एक महत्त्वाची राजधानी झाली आहे व तींत ३०० खोल्यांच्या मोठ्या होटेलाची अत्यंत जरूरी आहे. स्थानिक भांडवल व लोक ह्यांच्या सहकार्यानें परराष्ट्रांत होटेल्स उभारण्याचें हिल्टन कंपनीचें धोरण आहे. प्रस्तुत होटेल बांधून झाल्यावर, तें हिल्टन इंटर नॅशनल कंपनीकडे चालविण्यास देण्यांत येईल. हिल्टनच्या साखळींत वॉलडॉर्फ ॲस्टोरिया व प्लॅझा हीं न्यूयॉर्कमधील होटेलें, पामर हाउस व कॉनरॅड हिल्टन (३,००० खोल्या) हीं शिकॅगोमधील होटेलें, हाउस्टनमधील शॅमरॉक होटेल, त्याचप्रमाणें पोर्टोरिको, माद्रिद, इस्तंबुल व केरो येथील आंतरराष्ट्रीय होटेलें ह्यांचा समावेश होतो. मॉंट्रिअल, रोम, पश्चिम बर्लिन, हवाना, मेक्सिको, इत्यादि ठिकाणीं कंपनी होटेल्स बांधीत आहे. प्रवाशांच्या बहुतेकांस दिल्लींतील होटेलाची चांगली मदत होणार असल्यानें, त्याच्या योजनेचें स्वागत केलें जात आहे.

### ४९ नवे साखर-कारखाने

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत ४९ नवे कारखाने स्थापण्यांत येतील व ४६ जुने कारखाने वाढविले जातील. अशा रीतीनें, साखरेच्या वार्षिक उत्पादनांत ६·४ लक्ष टनांची भर पडून तें २२·५ लक्ष टनांवर जाईल.

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
राष्ट्रीय बचत योजना
व्याज ३ टक्के
माहितीसाठीं लिहा-अगर भेटा
मुख्य ऑफीस: सारस्वत बँक बिल्डींग, मुंबई ४
शाखा: फोर्ट, दादर, माहीम, बेळगांव, पुणें

### पेटंट्सच्या अर्जांत वाढ

१९५३ मध्यें भारत सरकारकडे पेटंट्ससाठीं २,२३५ अर्ज आले होते. त्यांची संख्या १९५४ मध्यें २,५०० झाली. त्यापैकीं ४५४ अर्ज भारतामधून आले व त्यांतील ४०३ अर्ज भारतीयांचेच होते. मुंबई व पश्चिम बंगाल ह्यांतून ५५% अर्ज आले; बाकीचे बहुतेक अर्ज दिल्ली, उत्तर प्रदेश, मद्रास, मध्य प्रदेश व म्हैसूर ह्यांतून मुख्यतः आले. एकूण अर्जांपैकीं ३७% अर्ज रासायनिक धंद्याविषयक होते.

### दि बँक ऑफ अमेरिका

दि बँक ऑफ अमेरिका ही जगांतील सर्वांत मोठी बिन-सरकारी मालकीची बँक आहे. तिचें खेळतें भांडवल १९५५ अखेर ९,६६,९१,४५,९७२ डॉलर्स इतकें होतें. म्हणजे, १९५४ अखेरच्या मानानें तें ५०,५७,९०,६८३ डॉलर्स जास्त भरलें. ठेवींची रक्कम ८,८०,२५,०६,१२८ डॉलर्स एवढी होती.

### गुळाच्या निर्गतीसाठीं नवें रेल्वे स्टेशन

कोपरगांव तालुक्यांतील गुळाच्या निर्गतीस सोईचें पडावें, म्हणून कोपरगांव आणि कान्हेगांव ह्यांच्या दरम्यान, दौंड-मनमाड रेल्वे फाट्यावर एक नवें स्टेशन उघडण्यांत आलें आहे. शेगांव येथें गुड्स व पार्सलें स्वीकारून तीं अहमदनगर येथें वॅगनींत भरण्याची व्यवस्थाहि रेल्वेनें केली आहे.

### नेपामिलचा न्यूजप्रिंट

मध्यप्रदेशांतील नेपानगर येथील कागद कारखान्यानें गेल्या वर्षी २,६०० टन कागदाचें उत्पादन केलें. तें सर्व खपून गेलें. केमिकल मिल आतां पुरी झाली असल्यानें, १००% स्वदेशी न्यूजप्रिंट तयार होऊं लागेल. ह्या न्यूजप्रिंटच्या विक्रीवर सरकारनें एक्साइज कर माफ केला आहे.

तमाम दंतरोगांवर
☆ नागछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ☆

## भारतांतील आयुर्विमा व्यवसायांत वाढ

भारतीय विमा कंपन्यांनीं १९५४ मध्यें एकूण २१३·२२ कोटी रु. विमा रकमेचें व हप्त्याचें वार्षिक उत्पन्न १०६७ कोटी रु. येणारीं ६,८३,००० विमापत्रें दिलीं. याच अवधींत भारतांत व्यवसाय करणाऱ्या परदेशीय कंपन्यांनीं एकूण १६·२२ कोटी रु. विमा रकमेचें व हप्त्याचें उत्पन्न ०·९४ कोटी रु. येणारीं २२,००० विमापत्रें दिलीं.

१९५३ सालाशीं तुलना करतां भारतयि विमा कंपन्यांनीं भारतांत केलेल्या आयुर्विमा व्यवसायांत १,४४,००० विमापत्रांची, एकूण ७५·१४ कोटी रु. विमा रकमेची व हप्त्याच्या उत्पन्नांत ३·२९ कोटी रु. रकमेची वाढ दिसून आली. भारतांत काम करणाऱ्या परदेशीय कंपन्यांच्यांत थोडी घट दिसून आली.

भारतीय विमा कंपन्यांनीं भारतांत मिळविलेल्या व १९५४ अखेर चालू असलेल्या आयुर्विम्यासंबंधीचे आंकडे असें आहेत ४०,६९,००० विमापत्रें, ९२१·९० कोटी रु. विमा रक्कम आणि ४२·६८ कोटी रु. हप्त्याचें उत्पन्न. मागील वर्षापेक्षा हे आंकडे विमापत्रांच्या बाबतींत सुमारें २,१४,००० विमापत्रांनीं, ८८·५४ कोटी रु. विमा रकमेनें आणि २·८१ कोटी रु. हप्त्याच्या उत्पन्नानें जास्त आहेत. परदेशी विमा कंपन्याचे हेच आंकडे असे आहेत. २,४४,००० विमापत्रें, १३६·९३ कोटी रु. विमा रक्कम आणि ७·४५ कोटी रु. हप्त्याचें उत्पन्न हे आंकडे मागील वर्षाच्या आंकड्यांपेक्षा विमापत्रांच्या बाबतींत ७,००० विमापत्रांनीं आणि हप्त्याच्या उत्पन्नाच्या बाबतींत ०·३१ कोटी रु. नीं कमी आहेत तर विमा रकमेंत ३·९० कोटी रु. वाढ आहे.

भारतीय विमा कंपन्यांनीं १९५४ मध्यें परदेशांत मिळविलेल्या आणि त्या वर्षाअखेर चालू असलेल्या आयुर्विमा कामाचे आंकडे असे आहेत ३२,००० विमापत्राद्वारें १७·४६ कोटी रु. विमा रक्कम असे आहेत.

भारतीय विमा कंपन्यांना मिळालेलें एकूण उत्पन्न १९५४ मध्यें ५८·९१ कोटी रु. होतें. परदेशयि विमा कंपन्याचें केवळ आयुर्विम्याचें उत्पन्न ९·३८ कोटी रु. या रकमेपैकी विमापत्रांची मुदत संपल्यामुळें, मागणी आल्यामुळें वा विमापत्रें रद्द झाल्यामुळें द्यावी लागलेली रक्कम भारतीय कंपन्यांच्या बाबतींत ३१·७० को. रु. व परदेशी कंपन्यांच्या बाबतींत ७.४१ कोटी रु. आहे. उरलेल्या २७·२१ कोटी रु. व १·९७ कोटी रु. या रकमा त्यांच्या आयुर्विमानिधींतील वाढ दर्शवितात.

इन्शुअरन्स कायद्याखाली २९५४ मध्यें एकूण १,१९,२६८ विमा एजंटाजे परवाने देण्यांत आले. त्यापैकीं ३८,४०९ किंवा ३३·२ टक्के परवाने स्त्रियांना दिलेले होते. याखेरीज प्रधान प्रतिनिधि म्हणून ८५७ प्रमाणपत्रें मुख्य एजंट म्हणून ३६९ व विशेष प्रतिनिधि म्हणून ६५,०७३ परवाने देण्यांत आले.

---

## एस्टेट ड्यूटीची दुबार आकारणी नको

भारत व ग्रेटब्रिटन ह्यांतील मालमत्तेवर दुबार एस्टेट ड्यूटी बसूं नये, ह्या दृष्टीनें दोन्ही देशांच्या प्रतिनिधींत सध्या दिल्ली येथें बोलणीं चालूं आहेत. दोन्ही देशांच्या विद्यमान कायद्याप्रमाणें एकाद्या माणसानें मृत्यूचे वेळीं दोन्ही देशांत मालमत्ता ठेवली तर तिच्यावर दोन्ही देश एस्टेट ड्यूटी घेऊं शकतात.


# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. पुणें शहर

पोस्ट बॉक्स नं. ५११ टेलिफोन नं. २४८३

पुणें जिल्ह्यांतील सर्व जनतेच्या विश्वासास पात्र झालेली ही सहकारी मध्यवर्ती बँक असून गेलीं आठ वर्षें आपले भागीदारांस ६ टक्के डिव्हिडंड देत आहे. भागविक्री चालू आहे. बँकेचे मुख्य कचेरींत सेफ डिपॉझिट व्हॉल्ट व सेफ कस्टडीची सोय आहे. पुणें शहरांत सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय प्रथमतः आपल्या बँकेनेंच सुरूं केली. जिल्ह्यांत सर्व तालुक्याचे ठिकाणीं बँकेच्या शाखा असून त्यांचे मार्फत बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. बँकेची सर्वांगीण प्रगति खालील आंकड्यांवरून दिसून येईल.

| | | |
|---|---|---|
| (१) दिनांक ३०–६–५५ अखेर भागांचें वसूल भांडवल | रु. | ८,३२,००० |
| (२) गंगाजळी व इतर फंडस् | रु. | ७,९६,००० |
| (३) एकूण ठेवी | रु. | १,६७,००,०००चे वर |
| (४) एकूण खेळतें भांडवल | रु. | १,९१,१७,०००चे वर |

वा. ग. अळतेकर
मॅनेजिंग डायरेक्टर.

# दि रत्नाकर बँक, लिमिटेड

स्थापना—१९४३

मुख्य कचेरी :—लक्ष्मी रोड, कोल्हापूर

— शाखा —

सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. १०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | रु. १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | रु. ५,०३,३०० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | रु. १,४०,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | रु. ५०,००,००० |

*—अद्यावत् बँकिंग—व्यवहार केले जातात—*

श्री. बी. बी. चौधरी, बी. ए., एलएल. बी., वकील. सांगली चेअरमन

श्री. महादेव बाळाप्पा चौगुले कोल्हापूर व्हा. चेअरमन

एल्. एन्. [illegible],
बी. कॉम, सी. ए. आय. आय. बी.
मॅनेजर.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास' ४२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.